SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

PRO
Policy Research Organization

चर्चेअंती एकमताने आलेल्या

# सूचना

# Roundtable on Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025



# Roundtable on
## Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025

# पार्श्वभूमी

सिम्बायोसिस सेंटर फॉर अर्बन स्टडीज (SCUS) आणि पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन (PRO) यांच्यातर्फे दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी संयुक्तपणे "शहरांची carrying capacity" या विषयावर एक पूर्ण-दिवसीय गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमात शहरी नियोजन तज्ञ, वास्तुविशारद, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, नागरिकांचे प्रतिनिधी आणि विषयतज्ज्ञांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भाग घेतला. यामध्ये शहरीकरण, शहरांची वहनक्षमता, आणि शहरी समस्या यावर चर्चा झाली. आणि चर्चेअंती, विविध पातळीवरील सरकारांसाठी काही सूचनादेखील केल्या गेल्या.

SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

PRO
Policy Research Organization

# Roundtable on
## Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025

# महानगरपालिकांसाठी सूचना

०१ शहरे राहण्यायोग्यतेची आहेत का नाही याचे प्रमुख निर्देशक मोजण्यासाठी, एकत्रित करण्यासाठी आणि त्यांचे निरीक्षण करण्यासाठी शहरांनी व्यापक डेटा डॅशबोर्ड स्थापित करावेत. हे डॅशबोर्ड सार्वजनिक डोमेनमध्ये उपलब्ध करून दिले पाहिजेत, जे महापालिका स्तरावर 'माहिती संग्रह' म्हणून उपयोगी ठरतील. या माहितीमुळे शहरे राहण्या योग्यतेची आहेत का नाही हे सतत समोर येत राहील आणि याची चर्चा होत राहील. शहरातील स्थलांतरित लोकसंख्येचा आवश्यक डेटा तयार करण्यासाठी आणि राखण्यासाठी संभाव्य माहिती यंत्रणा निर्माण करणे अतिशय गरजेचे आहे.

०२. महानगरपालिकांसाठी उत्पन्नाचे स्वतंत्र स्रोत उभारण्यासाठी आणि त्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी आर्थिक आणि राजकोषीय विकेंद्रीकरण आवश्यक आहे.

०३. राज्य वित्त आयोगांनी (एसएफसी) स्पष्ट सूत्राच्या आधारे अनुदान वाटप करण्याची शिफारस केली आहे, जी समाविष्ट केली पाहिजे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात, महानगरपालिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या पाहिजेत.

०४. महानगरपालिकांचे आर्थिक व्यवस्थापन, निधी संकलन आणि त्याबाबतची उत्तरदायित्व यंत्रणा मजबूत करण्यासाठी क्षमता-निर्मिती संबंधित विविध उपक्रम हाती घेतले पाहिजेत.

०५. नागरिक आणि लोकप्रतिनिधींशी व्यवहार करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे आणि यामध्ये माहितीचे योग्य वितरण, प्रश्नाची समज आणि त्याबाबत संवेदनशीलता निर्माण करणे या संबंधित कार्यक्रमांचा समावेश असू शकतो.

SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

PRO
Policy Research Organization

# महानगरपालिकांसाठी सूचना

०६. महानगरपालिकांची मदत करण्यासाठी सल्लागार आधारावर बाह्य एजन्सींकडून अधिक कौशल्याचा वापर केला जाऊ शकतो.

०७. दाट वस्ती असलेल्या वसाहती व कार्यक्षेत्रांचे पुनर्वर्गीकरण हे तथ्यांवर आधारित असावे. शहरीकरणाच्या पातळीवर संबंधित व्याख्या निश्चित केल्यास नियोजन अधिक परिणामकारक होईल.

०८. जिल्हा नियोजन समित्या (DPCs) आणि महानगर नियोजन समित्या (MPCs) यांच्यामार्फत साधनसंपत्तीचे परिणामकारक नियोजन करणे आवश्यक आहे. यामुळे स्थानिक गरजा लक्षात घेऊन संसाधनांचे वाटप अधिक न्याय्य व सुयोग्य पद्धतीने करता येईल.

०९. विविध प्राधिकरणांमध्ये माहितीचे प्रकाशन, आदान-प्रदान व संवाद यांना कायदेशीर बंधनकारक स्वरूप देण्यात यावे. अशा तरतुदीमुळे विलंब व गोंधळ टाळता येईल, आंतरसंस्था समन्वय अधिक मजबूत होईल आणि प्रकल्प राबविणे व अंमलबजावणी यांची कार्यक्षमता वाढेल.

१०. महापौर या पदाकडेकेवळ नामधारी प्रमुख म्हणून न पाहता त्या पदाला अधिक स्पष्ट अधिकार, निर्णयक्षमता व संस्थात्मक मान्यता प्रदान करणे आवश्यक आहे. हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सशक्तीकरणासाठी अत्यावश्यक आहे.

# Roundtable on

## Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025

# राज्य सरकारसाठी सूचना

०१ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम (MRTP Act) कायद्याचे संपूर्ण पुनरुज्जीवन व पुनरावलोकन केले जाणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून आजच्या शहरीकरणाची गरज, शासनव्यवस्थेतील आवश्यकतांचे भान आणि शाश्वततेशी संबंधित मुद्दे या कायद्यात समाविष्ट करता येतील. सुधारित अधिनियमाने केवळ प्रभावी भू वापर नियोजनावर न थांबता राहणीमानाची गुणवत्ता, पायाभूत सुविधा व नागरिकांचा सहभाग या सर्वांचा समन्वित दृष्टीकोन स्वीकारता येईल.

०२. राज्य व केंद्र सरकारांनी प्रशिक्षित नगररचनाकारांच्या (Urban Planners) भरतीस प्राधान्य द्यावे. व्यावसायिक नगररचनाकारांना शहर विकासाची रचना करणे व त्याचे मार्गदर्शन करणे ही जबाबदारी सोपविण्यात यावी, ज्यायोगे शहरी वाढ ही समन्वित, शाश्वत व नागरिकांच्या गरजांना प्रतिसाद देणारी ठरेल.

०३. शहरांसाठी तयार होणारे विकास आराखडे हे साधारणतः २० वर्षांसाठी आखले जातात. परंतु, नागरिकांच्या बदलत्या मागण्या, उद्भवणाऱ्या शहरी समस्या आणि गतिशील वाढीच्या इत्यादींना प्रतिसाद देण्यासाठी राज्य सरकारने हे आराखडे दर ३ ते ५ वर्षांनी पुनरावलोकन व अद्ययावत करावेत.

०४. प्रलंबित जमीन संबंधित वादांचे निराकरण करण्यासाठी महानगरपालिका पातळीवर औपचारिक वाद-निराकरण यंत्रणा स्थापन करण्याची गरज आहे. अशा यंत्रणेमुळे विलंब कमी होईल, न्यायालयीन प्रकरणांची गर्दी टळेल आणि शहरी विकास प्रकल्पांची अंमलबजावणी अधिक सुरळीत होईल.

SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

PRO
Policy Research Organization

# Roundtable on
## Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025

# राज्य सरकारसाठी सूचना

०५. राज्यस्तरीय वाहतूक प्राधिकरण (State-level Transport Authority) स्थापन करणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून शहर व प्रादेशिक स्तरावर समन्वित, कार्यक्षम आणि शाश्वत गतिशीलतेच्या (mobility) उपाययोजना राबविता येतील. अशा प्राधिकरणाच्या स्थापनेमुळे विविध वाहतूक पद्धतींमध्ये सारखेपणा साधण्याचा प्रयत्न करता येईल आणि सार्वजनिक वाहतूक पायाभूत सुविधांसाठीच्या दीर्घकालीन नियोजनास चालना मिळेल.

०६. सध्या महाराष्ट्रात व्यापक अशा राज्यस्तरीय शहरी धोरणाचा अभाव आहे. योग्य धोरणात्मक चौकट असल्यास नियोजन, सेवा पुरवठा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शासकीय कार्यपद्धतींमध्ये सुसंगती येईल तसेच झपाट्याने होणारे शहरीकरण, परिघीय विस्तार आणि प्रादेशिक असमतोल या आव्हानांना अधिक सक्षमपणे सामोरे जाता येईल.

०७. अहवाल, आराखडे व संबंधित माहितीचे प्रकाशन हे संबंधित राज्य कायद्यांतर्गत (State Acts) विधिसंमत बंधनकारक करण्यात यावे.

०८. ग्रामीण प्रदेशांना एकात्मिक, सुयोजित व शाश्वत मॉडेल म्हणून विकसित करणे आवश्यक आहे, ज्यायोगे तेथील जीवनमान उंचावेल व शहरांवरील ताण कमी होईल.

०९. 'ग्रामीण भागासाठी शहरी सोयीसुविधा' यासारख्या योजना ग्रामीण भागाच्या विकासावर लक्ष केंद्रित करत राबवायला हव्यात. यामुळे रोजगारनिर्मिती होईल, तसेच पायाभूत सुविधांचा विकास होईल आणि शहरीकरण अधिक संतुलित पद्धतीने होण्यास मदत होईल.

SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

PRO
Policy Research Organization

# Roundtable on

## Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025

# भारत सरकारसाठी सूचना

०१. स्थानिक स्वराज्य संस्थांना (ULBs) अधिक कार्यात्मक, आर्थिक व प्रशासकीय स्वायत्तता प्रदान करण्यात यावी. स्वायत्ततेमुळे या संस्था स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतील, संसाधनांचे प्रभावी नियोजन करू शकतील यामुळे अधिक परिणामकारक नियोजन, नागरिकाभिमुख सेवा पुरवठा आणि शाश्वत शहरी व्यवस्थापन साध्य करता येईल.

०२. राज्य व केंद्र सरकारांनी प्रशिक्षित नगररचनाकारांच्या (Urban Planners) भरतीस प्राधान्य द्यावे. व्यावसायिक नगररचनाकारांना शहर विकासाचे नियोजन आणि मार्गदर्शनाची जबाबदारी सोपविण्यात यावी, ज्यायोगे शहरांची वाढ अधिक सुनियोजित आणि शाश्वत प्रकारे पुढे नेता येईल.

SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

॥वसुधैव कुटुम्बकम्॥

PRO
Policy Research Organization

# Roundtable on
## Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025

# सहभाग

## मसुदा लेखन

प्रा. डॉ ज्योती चंदिरमाणी, तन्मय कानिटकर, डॉ. गार्गी पाटील, नेहा महाजन, आणि डॉ. सब्यसाची त्रिपाठी.

## गोलमेज बैठकीतील सहभागी व्यक्ती

डॉ रामनाथ झा, डॉ राम भगत, डॉ रविकांत जोशी, महेश झगडे, प्रा. अभय पेठे, रणजित गाडगीळ, अनघा परांजपे-पुरोहित, मंदार शिंदे, इंद्रनील सदलगे, सिद्धार्थ लॅरेन्स बेनिंजर, डॉ चांदनी तिवारी, डॉ शुची मिश्रा, डॉ अश्विनी शेंडे, डॉ नवाझुद्दीन अहमद, बागेश्री येवलेकर, प्राची कुलकर्णी, मनोज जोशी, संकेत दगडे.

SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

PRO
Policy Research Organization

# Roundtable on
## Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025



गोलमेज बैठकीत सहभागी सर्व मान्यवर

SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

॥वसुधैव कुटुम्बकम्॥

PRO
Policy Research Organization

# Roundtable on
## Carrying Capacity of Cities

A Part of a Series of Roundtables on Urban Policy by PRO

MONSOON SESSION
2025

# संपर्क :


| | |
|---|---|
| डॉ ज्योती चंदिरमाणी: | +91 98900 98201 |
| नेहा महाजन: | +91 8007971692 |
| तन्मय कानिटकर: | +91 9823431138 |


SYMBIOSIS CENTRE FOR URBAN STUDIES

PRO
Policy Research Organization